जनहित याचिका क्र.९/२०१७ च्या अनुषंगाने राज्यातील कारागृहामधील नविन बॅरेकचे बांधकाम/दुरुस्ती/नुतनीकरण इत्यादी या कामांच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र. जेएलएम-०९१८/प्र.क्र.१५९/तुरुंग-२,

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ९ ऑगस्ट, २०१९.

वाचा:

१. अपर पोलीस महासंचालक, कारागृह महानिरीक्षक व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. बीएलडी/४०५९ अंदाजपत्रक/फेर सादर/दुरुस्ती-निधी/९०५८/ हस्तपोच/२०१८ कक्ष-६ (३), दिनांक २५.९.२०१८

२. अपर पोलीस महासंचालक, कारागृह महानिरीक्षक व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची पत्रे क्र.२०१९/३७८२,४७६९,४७७०,३७८६,४७५६,४७५५,२४२१.

३. गृह विभाग, शासन निर्णय क्र. जेएलएम-०९१८/प्र.क्र.१५९/तुरुंग-२, दिनांक १३.०२.२०१९ व दिनांक २४.५.२०१९.

प्रस्तावना:

जनहित याचिका क्र.९/२०१७ च्या अनुषंगाने राज्यातील कारागृहामधील नविन बॅरेकचे बांधकाम/दुरुस्ती/नुतनीकरण तसेच कंपाऊंड वॉल बांधणे या २७ कामांचे अंदाजत्रके छाननीकरीता व तपासणी करीता सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केले असता विभागाने त्यापैकी (१ प्रस्ताव अप्राप्त) १७ कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची सहमती देऊन ९ कामांसंदर्भात त्रुटीची पुर्तता करुन प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत कळविले आहे. त्यापैकी १७ कामांना संदर्भिय क्र.३ येथिल दिनांक १३.२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये व तदनंतर ९ कामांपैकी ३ कामांना संदर्भिय क्र.३ येथील दिनांक २४.५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित ७ प्रस्तावांची छाननी अंती सार्वजनिक बांधकाम विभागाने रु.३१४९.६० लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे. त्यास अनुसरुन याद्वारे शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:

जनहित याचिका क्र.९/२०१७ च्या अनुषंगाने राज्यातील कारागृहामधील नविन बॅरेकचे बांधकाम/दुरुस्ती/नुतनीकरण इत्यादी खालील नमूद यादीतनुसार ७ कामांना त्यांचे नावासमोर

दाखविलेल्या रक्कमेच्या खर्चाच्या अंदाजपत्रकांस या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

कामांची यादी -

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रु . (लक्ष मध्ये)
१	२	३
१	कोल्हापूर जिल्हा कारागृहात २३ बॅरेकचे फरशी बसविणे व रंगकाम करणे	रु.९८.६३
२	नागपूर मध्यवर्ती कारागृहातील सर्व बॅरेकचे नुतनिकरण करणे	रु. ९११.९५
३	नागपूर मध्यवर्ती कारागृहातील ८ नविन बॅरेक बांधणे	रु. ८९३.९०
४	नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथील महिला यार्ड भोवती कंपाऊंड वॉल बांधणे	रु. ५९.१३
५	सातारा जिल्हा कारागृहामध्ये साठ पुरुष बंद्यासाठी नवीन बॅरेक बांधणे	रु. ३६९.४५
६	बुलढाणा जिल्हा कारागृह येथे नविन पुरुष बंदी (३०) क्षमतेचे १ बॅरेक, नवीन महिला बॅरेक (३०) क्षमता, वॉच टॉवर व तटभिंत बांधणे	रु. २९४.२२
७	ठाणे मध्यवर्ती करागृहातील निवासी/अनिवासी इमारतींच्या छतावर ॲसबेस्टॉस शिटस ऐवजी प्रिकोटेड शिटस बसविणे	र.५२२.३२
	एकूण (अक्षरी रुपये एकतीस कोटी एकोणपन्नास लाख साठ हजार फक्त)	**रु.३१४९.६०**

२. सदर अंदाजपत्रकामध्ये वस्तु व सेवा कर १२ टक्के साठी तरतूदी समाविष्ट करण्यात आली आहे. तसेच नवीन बॅरेक बांधकामांचे अंदाजपत्रके, नकाशे साक्षांकित करणे आवश्यक राहील.

३. या साठी होणारा खर्च मागणी क्र. एच-८, ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च (४०५९ ०९१२) (०१) (१०१)/ (११) (०१) (तुरुंग) (योजनांतर्गत योजना) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणा-या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-पाच, अनुक्रमांक-३, नियम १३४ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेले अधिकार व सार्वजनिक बांधकाम विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.२७८/१९/इमा-२, दिनांक २६.०६.२०१९ द्वारे दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१३१२०९२१७४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Siddharth Vidyadhar Dhandore

Digitally signed by Siddharth Vidyadhar Dhandore
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=18c12c8352414c8a8937fd0998c9ca8d81b7ea489acfd97 1bb6de950e8d1d54f, serialNumber=5d16166df09e111cba9c7d5e4e321b340111df7b2 1c5b0fff0be638e80ea9a1b, cn=Siddharth Vidyadhar Dhandore
Date: 2019.08.13 12:19:47 +05'30'

(सि. वि. धांडोरे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. पोलीस महासंचालक (कारागृह), महाराष्ट्र राज्य,मुंबई,
४. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विशेष पोलीस महानिरिक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे,
६. विशेष पोलीस महानिरिक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई,
७. कारागृह उपमहानिरिक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई,
८. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर,
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, सातारा, बुलढाणा, ठाणे
११. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, सातारा, बुलढाणा, ठाणे
१२. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई,
१३. कक्ष अधिकारी, (बियुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. निवडनस्ती तुरुंग २, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

****